# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३५४३**

**अपिलार्थी श्री. सलीम शेख**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
माहिती आणि जनसंपर्क माहिती महासंचालनालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०३.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित(व्ही.सी.व्दारे)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०८.२०२४ | २४.१२.२०२४ | ०८.१०.२०२४ | |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.११.२०२४ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थी यांनी दि. १३.०८.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:-

*"Directorate General of Information & Public Relations (DGIPR), Mumbai have released its advertisement entitled Employment opportunity in Germany" on dt. 10.08.2024 in various newspapers of Maharashtra.*
*(1) A copy of Letter / Release Order by School Education & Sports Department, Mumbai to DGIPR, Mumbai for release of above cited advertisement.*
*(2) File notings / note sheets etc. with regard to prior to release of above cited advertisement.*
*(3) List of Newspapers in which said advertisement have been published."*

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थीनी दि. ०८.१०.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी (व्ही.सी.माध्यमाव्दारे) व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी

..२/-

श्री. राजेंद्र राणे सेवानिवृत्त झालेले आहेत. परंतु, अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलार्थींचा दि.१३.०८.२०२४ रोजीचा माहिती अर्ज दि. २६.११.२०२४ रोजी प्राप्त झाला व दि. २४.१२.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, अर्जामध्ये विचारणा करण्यात आलेली जाहिरात माहिती व जनसंपर्क महासंचालनामार्फत प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

४. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, माहिती अर्जाच्या अनुषंगाने तसेच प्रथम अपीलानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतेही पत्राची प्रत प्राप्त झालेली नाही.

५. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या अभिलेखाप्रमाणे प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

६. जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.१२.२०२४ रोजीचे पत्र व दि. २४.१२.२०२४ रोजीचे पत्र अपिलार्थींना पाठविल्याची जावक नोंदीची प्रत तसेच प्रथम अपील विषयी वस्तुस्थिती अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क पाठवावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०५.०३.२०२६**

State Information Commission Greater Mumbai

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**